Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – IV December 2014

# आदिवासी समाज आणि साहित्य

डॉ. वेदश्री विजय थिगळे,
सहयोगी प्राध्यापिका, प्रपाठक,
कर्मवीर शांतारामबापू वावरे महाविद्यालय, उत्तमनगर,
सिडको, नासिक : ८

भूतलावर अनेक स्थित्यंतरांना सामोरे जावून मानवी जीवन अस्तित्वात आले. माणसाला माणसाची आणि माणूसकीची जाणीव झाली आणि संस्कृती अस्तित्वात आली. या संस्कृतीच्या आविष्कारासाठी सर्जनशील आविष्कार करणारे साहित्य निर्माण झाले.या निर्मितीतही काही स्थित्यंतरे आढळतात. प्रादेशिक, भाषिक, राजकीय, स्वसंरक्षणाच्या गरजेतून आणि सामाजिक, सांस्कृतिक स्तरावर मानवांचे समूह वेगवेगळया ठिकाणी स्थलांतरीत झाले. त्यातील आदिवासी हा मूळचा मानवसमूह. तो आर्य आणि द्रविडांपासून स्वतःचे संरक्षणार्थ डोंगराळ भागात राहू लागला. तेथेच विसावला. त्या परिसराशी एकरूप झाला. आदिवासी म्हणजे‘ एकच समान भाषा बोलणारे, एकाच पूर्वजापासूनचा वंश सांगणारा समूह, एकाच प्रदेशात वास्तव्य करणारा समाज, ज्ञानाच्या संदर्भात मागासलेला, परिवर्तनापासून दूर राहिलेला, अक्षरओळख नसलेला आणि रक्तसंबंधावर आधारित सामाजिक, राजकीय, रितीरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणारा एकजिनसी गट होय.’

भारतीय संस्कृती जेव्हा वैभवात होती तो काळ भृगू, कण्व, मौर्य, गुप्त यांचा काळ, त्याला सुवर्णयुग असे संबोधले गेले. कंबोडिया, जावा, सुमित्रा या देशांमध्येही हिंदूंचे साम्राज्य होते पण पाटलीपुत्र सभोवतालच्या डोंगर-दऱ्यात वावरणाऱ्या आदिवासी समाजाला मात्र या सर्व राजधान्यांना हिंदू संस्कृतीत सामावून घेता आले नाही. याचे कारण या आदिवासी समाजाचे अलिप्तपण असावे. स्वसंरक्षणासाठी हा समाज रानावनात राहू लागला आणि कायमचा तिथलाच झाला. पुढील काळात तर अनेक सत्तांतरे झाली तरी हा समाज शहरात राहायला आला नाही. याचे कारण त्या समाजाची स्वतःची अशी जगण्याची सामाजिक आणि सांस्कृतिक शैली असावी.

महाभारतात आपल्याला एकलव्याच्यारूपाने या समाजाची ओळख होते. पण ही एकलव्यापासून सुरू झालेली परंपरा आपल्याला आजही टिकून असल्याचे जाणवते.एकलव्य शूर होता, तसे हे आदिवासी स्वसंरक्षणात तरबेज असतात. पण प्रगतीपासून हा समाज नेहमीच दूर राहिल्याने या समाजाची वेगळी ओळख त्या त्या राज्यकर्त्यांना झालेली नाही आणि याचे या समाजाला काहीही गम्य नाही.

पण अलीकडे हा आदिवासी समाज आणि अभ्यासक, संशोधक जागृत झालेले आहेत. त्यामुळे हा समाज

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – IV December 2014

आता डोंगराळ भागातून बाहेर पडू लागला आहे. आपल्या अस्तित्वाची, हक्कांची जाणीव त्याला झालेली आहे. या समाजाचा, त्यांच्या संस्कृती आणि साहित्याचा अभ्यास करणारी मंडळी त्यांच्यापर्यंत पोहोचू लागली आहे.महाराष्ट्रात आजही अनेक आदिवासी जमाती डोंगरद-यांमध्ये राहत आहेत.यामध्ये प्रामुख्याने भिल्ल, तडवी, पारधी, आंध्र, ठाकूर, कोकणा, वारली, कोलाम, कोळी, कातकरी, गोंड, कोरकू, ठकार, बंजारा, कोलाम, पावरा, परधान, पारली, हलबा, कुंवर, कोलाम, पाडवी, लमाणी, महादेव कोळी, राजगोंड, मल्हार कोळी इत्यादी जमाती आढळतात. महाराष्ट्रात सातपुडा पर्वत, सहयाद्री पर्वत, अकोला, अमरावती, यवतमाळ, भंडारा, बुलढाणा, सुरगाणा, पेठ, औरंगाबाद,नाशिक, पुणे, जळगाव, ठाणे, वाडा,धुळे, नंदुरबार अशा विविध प्रदेशांत आदिवासींच्या विविध जाती आणि जमाती आढळतात.

19 व्या शतकात या समाजाला सामाजिक न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला गेला. त्यासाठी कायदेही केले. साधारणतः या काळापासून आदिवासी समाजात जागृती आली. काहीसा शिक्षण प्रसार, अस्तित्वाचे काहीसे भान आले. कारण मिशन-यांनी त्यांना या शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्नही केला. स्वातंत्र्यानंतर तर राज्यघटनेतच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आदिवासींचे अधिकार आणि सवलती लिहून ठेवल्या आहेत. देशाच्या विकासाच्या पंचवार्षिक योजनांमध्ये आजही त्यांच्या विकासासाठी काही खास योजना आणि रक्कम राखीव आहे. त्यांच्या विकासासाठी, जागृतीसाठी अनेक प्रसारमाध्यमेही शासनाने कार्यान्वित केलेली आहेत.

- **आदिवासी समाज :**

इंपिरिअल गॅझेटनुसार आदिवासी म्हणजे ‘समान बोलीभाषा बोलणा-या, एकाच भूभागात राहणा-या, सुरूवातीला अंतर्विवाही असण्याची शक्यता असलेल्या पण सर्वसामान्यपणे अंतर्विवाही नसलेल्या व समान नाव धारण करणा-या कुटुंबांच्या समुहाला आदिवासी समाज असे म्हणतात.’ भारतीय संस्कृती कोशात आदिवासी समाजाची व्याख्या केली आहे की, ‘आर्य व द्रविड हे भारतातील दोन मोठे मानव समाज सोडून त्यांच्यापूर्वीच भारतात राहणा-या किंवा बाहेरच्या देशातून आलेल्या व वने, पर्वत, यांच्या आश्रयाने स्थायिक झालेल्या अशा वन्य जमातींना आदिवासी असे म्हणतात.’

‘आदिवासी’ हा शब्द ‘ॲबेरिजिनीस’ या इंग्रजी शब्दाचा मराठीतील पर्यायी शब्द आहे. आदिवासी हे प्रिमिटिव्ह म्हणजे आदिम अप्रगत असे आहेत. ते ओरिजिनल आहेत.मूळात ते रानात राहणारे रानटी आणि प्रगत परिसरापासून दूर असलेले म्हणून मागासलेले आहेत.

- **आदिवासी समाजाचे काही विशेष –**
    - भारतातील मूळ निवासी समाज पण आर्यांच्या काळात वनवासी झालेला समाज.
    - आर्यांच्या आक्रमणातून स्वतःचा बचाव करण्यासाठी डोंगर, नदी, जंगले, नाल्यांचा आसरा घेणारा समाज. जंगलात राहणारा व जंगलचा राजा म्हणून ओळखला जाणारा समाज.
    - शहरी व ग्रामीण समाज संस्कृतीपासून अंतरलेला समाज.
    - शेती, मजूरी, शिकार करून फळे, कंदमुळे गोळा करून उदरनिर्वाह करणारा व वनौषधी संकलन करणारा समाज.
    - निसर्ग व सजीव सृष्टीशी एकरूप झालेला समाज.
    - नगर संस्कृतीपासून उपेक्षीत राहिलेला समाज. पोटासाठी धडपडणारा व भटकंती करणारा समाज.
    - सावकार, जमीनदार, व्यापारी व श्रीमंत शेतक-यांकडून शोषण झालेला समाज.
    - दारिद्रय, अन्याय, वेठबिगारी, विवंचनावर मात करून स्व-संस्कृती,परंपरा टिकविणारा समाज.
    - जुलमी सत्तेविरूध्द लढा देऊन स्वतःचे सांस्कृतिक अस्तित्व टिकवून व दृढ करणारा समाज.
    - सरंजामशाही, वसाहतवाद, साम्राज्यवादाचा बळी ठरलेला समाज.
    - गुलामगिरीतच अनेक पिढया वाढवणारा समाज.
    - शिक्षण, परिवर्तन, विकास या संज्ञांपासून दूर राहिलेला समाज.
    - स्वतःचे आगळे-वेगळेपण टिकवू पाहणारा समाज, वेशभूषा, आहार-विहार, चालीरिती, परंपरा श्रध्दा, अंधश्रध्दाही जोपासणारा समाज.
    - स्वतःचे दैवत, सण, उत्सव, कला, वाद्य, संगीत यांतले आपले परंपरागतपण जोपासणारा समाज.
    - आदिवासी समाज अशिक्षीत आहे, निर्धन आहे, निरक्षर आहे पण असंस्कृत नाही. कारण त्याची खास स्वतःची अगदी स्वतःची शैली असलेली, मूल्य असलेली संस्कृती आहे.

- **आदिवासी समाजाची लोकगीते :**

अलेक्झांडर क्रॉप यांनी लोकगीताची व्याख्या केली आहे की,‘लोकगीत हे भावगीत असून लोकगीतांचा उगम निरक्षरात होवून त्याचा कर्ता अनामिक असतो.लोकगीतांची निर्मिती भूतकाळातील असून कित्येक शतकांची परंपरा यात सामावलेली असते.’

आदिवासींच्या भाषा हया बोलभाषा आहेत.त्यांना लिपी नाहीत. ती गीत मराठी भाषेत आपण लिप्यंतरीत केलेली आहेत.जंगलातील रानवाटांवरून फुलपाखरांप्रमाणे स्वच्छंदी हिंडतांना, अस्सल रानमेव्याचा आस्वाद घेत घेत आपल्या मूळच्या पहाडी आणि खडया आवाजात स्वतःच तयार केलेल्या संगीताच्या साधनांच्या साथीने ते जेव्हा गीत गात गात जातात.त्यांची ती गीते ऐकतांना किंवा गीतांसह नृत्य पाहतांना एक वेगळाच आनंद होतो. त्यांचे साहित्य हा एक एका संस्कृतीचा जतन केलेला ठेवाच आहे.

त्यांच्या गीतात नादयुक्त शब्दरचना असते. या गीतांची निर्मिती अनेकदा समूहमनातून झालेली असते. यांचा मूळ कर्ता सांगता येत नाही. कारण एका पिढीकडून दुस-या पिढीकडे यांचे साहित्य संक्रमित होत असते. कधी कधी गाण्यात काही निरर्थक शब्द असतात.पण हे शब्द सुध्दा नादमयतेसाठी अर्थपूर्ण होतात. त्यांच्या गाण्यांना पक्षांचा किलबिलाट, कधी सिंहाची गर्जना किंवा कधी वाघाची डरकाळीही साथ देवून जाते. त्यांचा हा आविष्कार नेहमी समूहातून समूहासाठीच होत असतो. कधी कधी आदिवासी हे शीघ्र कवीही असतात. त्यांच्या गाण्याची लय, नाद आणि ताल हे कायम असतात. लोकगीत आणि लोकनृत्य हे एकाच वेळी साथीने सादर केले जातात. कधी कधी नृत्य करता करता त्यांना गाणे स्फुरते. हे गाणे त्याचे वेळी त्यांच्या पध्दतीने सादर केले जाते.

आदिवासी लोकसाहित्याचा विचार करता यात लोककथा, कहाण्या, लोककथात्मकगीते, विधीगीते, यांचा समावेश आहे. त्यातही लोकगीतांची संख्या मोठया प्रमाणावर पहायला मिळते.ही लोकगीते पारंपरिक व मौखिक आहेत व या गीतांचा रचनाकार मात्र कोण आहे याचा उल्लेख कोठे आढळत नाही. आदिवासींच्या लोकगीतांतून तत्कालीन व पूर्वीच्या समजातील चालत आलेल्या रूढी, परंपरा, चालीरीती, अंधःश्रध्दा, लोकसमजुती दिसून येतात.आदिवासी स्त्री-पुरूषांच्या जीवनाची अधिक जवळून ओळख होते ती या सर्व लोकगीते, लोककथागीते, उखाणे, म्हणी यांतून.लोकगीतांमध्ये प्रामुख्याने नृत्यगीते, विवाहगीते, शिकारीची गीते, अंगाई गीते, शोकगीते, शेतक-यांची गीते इत्यादींचा समावेश आहे. आदिवासी स्त्रियांवर आधारीत गीते साधारणतः तिच्या माहेर-सासर या विषयांवर रचलेली आढळतात.या लोकगीतांमधून आदिवासी स्त्री बंडखोर असल्याचे दिसून येते. आदिवासी लोकांचे लोकजीवनच या गीतांमधून साकारलेले आहे व म्हणूनच ती अढळ स्वरूपाची आहेत.ही लोकगीते जशी वैयक्तिक जीवनावर तशीच बरीचशी समूहगीतेही असल्याचे प्रामुख्याने आढळून येते.या लोकगीतांना गेयता आहे, तालबध्दता आहे. ही लोकगीते बहुतांशी निसर्गावर म्हणजेच नदी, झरे, शेत, डोंगर, दरी-खोरे यांसारख्या विषयांवर पहावयास मिळतात. या लोकगीतांमध्ये साधारणतः स्त्रियांची गीते, पुरूषांची गीते, लहान मुला-मुलींची गीते, बडबडगीते इत्यादी

प्रकारची गीते आढळतात. या लोकगीतांमधून आदिवासींचे वास्तवच मोठया प्रमाणावर प्रकट झालेले दिसते. विधीगीते व इतर गीतेही मोठया प्रमाणावर आढळतात.

आदिवासी लोकगीते ही मोठया प्रमाणावर स्त्रीजीवनावर आहेत, त्यातून आदिवासी स्त्रीची भाववृत्ती, तिच्यावर झालेले रूढी-परंपरांनुसार संस्कार व त्यातून झालेली तिची मनोवृत्ती दिसून येते. या लोकगीतांमधून स्त्रीजीवनाचे सामाजिक रूप पाहावयास मिळते. तसेंच त्यातून स्त्री-समूह मनाच्या विविध अशा मनोवृत्ती व भाव-भावना मांडलेल्या आढळतात. एकूणच स्त्री जीवनाच्या विविध अवस्थांचे प्रतिबिंब या लोकगीतांमधून पहावयास मिळते.स्त्रीजीवन हे लग्नापूर्वीचे आणि लग्नानंतरचे असे दोन टप्प्यात विभागलेले असते.या दोन्ही टप्प्यांमधून स्त्रीला आपल्या जीवनात अनेक भूमिका पार पाडावयाच्या असतात. या सर्वच भूमिकांवर आधारीत अशी ही स्त्रीजीवनावरील लोकगीते आढळतात.

आदिवासी जीवनावर लिखीत स्वरूपात वाड्.मय फारसे आढळत नसल्याने पिढयान् पिढया चालत आलेल्या या लोकगीतांमधूनच त्यांच्या संस्कृतीचे दर्शन होते.ही लोकगीते मौखिक स्वरूपात असून ती लिहून ठेवलेली आढळत नाहीत. लोकगीतांबरोबरच लोककहाण्यांमधूनही आदिवासींची संस्कृती टिकून असल्याचे दिसून येते.प्रसंगानुरूप ही गीते म्हटली जातात. बहुधा ही लोकगीते स्त्रिया एकटया-दुकटया न म्हणता दोघी-तिघी सामूहीकपणे गात असतात. लग्न, आणि त्यातील वेगवेगळे प्रसंग, नारन देवाच्या पूजेच्यावेळी म्हटली जाणारी गाणी, धान्य, सण, समृध्दी, यांवर आधारीत लोकगीते मोठया प्रमाणावर दिसून येतात.

आदिवासी लोक डोंगर द-यांतून टोळया करून राहत असत व आजही राहतात. हाकेच्या अंतरावर त्यांच्या नातलगांच्या वस्त्या असतात. पिढयान् पिढया त्यांना शिक्षणाचा गंध नाही, त्यामुळे साधी साक्षरता देखील त्यांच्यात आढळत नाही. त्यामुळे आदिवासी स्त्री-पुरूषांची ही लोकगीते अगदी साधीभोळी पण गेयता असलेली अशी आहेत, ती ऐकतांना आपण त्यात तल्लीन होवून जातो,रमून जातो.नेहमीच निसर्गाच्या सान्निध्यात रहात असल्याने आदिवासींच्या या लोकगीतांमागे त्यांचे श्रध्दाळू पण स्वच्छंदी असे मन आढळून येते.आदिवासी लोकगीते ही प्रामुख्याने त्यांच्या बोलीभाषेतच आढळतात. पुष्कळदा त्यांची ही गीते समजतही नाहीत.

मराठवाडयातील परभणी व नांदेड जिल्हयात राहणारी आदिवासी आंध्र ही जमात बरीचशी मराठी बोलीभाषाच बोलत असल्याने त्यांची लोकगीते मराठी बोलीभाषेत आढळतात. लोकगीते, लोककथागीते, ओवीगीते, असे स्वरूप या लोकगीतांचे आढळते. या लोकगीतांमधून पौराणिक कथा आल्या असल्या तरी त्यातून त्यांचे लौकिक जीवनाचे दर्शन घडविलेले असते.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – IV December 2014

मेळघाटातील कोरकू हे 'मुंडेरियन भाषा' समूहापैकी एक आहेत. त्यांच्या आणि पावरी भिल्ल भाषेचे असलेल्या भिल्ल जमातीच्या लोकगीतांमधून विविधता आढळते, या गीतांमधून महादेव व सूर्य या देवतांचा अधिक उल्लेख झालेला आहे. जलदेवता, आसरा, अग्नी, पर्जन्य व प्राणीदेवता हे विषय या लोकगीतांमधून येतात. कोरकू आणि भिल्ल जमातीच्या लोकांची स्वतःची अशी बोलीभाषा आहे व त्या बोलीभाषेतूनच ती आपली लोकगीते गातांना आढळतात. कोरकू आदिवासींमध्ये पुरूषांच्या गीतांमध्ये फगनई गीते, चाचरी, दांडेल,गोग्गलिया, भामटा, होरहार किंवा होरार, अशी काही गीते असतात तर स्त्रियांच्या गीतांमध्ये फगनई, लेंगा, चिरूडी, चाचरी आणि डोलार, गोग्गलिया विधीगीते, देवदेवतांवर गीते व अन्य प्रासंगिक गीते म्हणजे लग्नविधीची गीते, कृषीविषयक गीते अशी लोकगीते आढळून येतात.आदिवासी भिल्लांची पावरा भिल्ल ही उपजात आहे. या पावरा भिल्ल जमातीत 'होळी' हा सण मोठया प्रमाणावर साजरा करतात. होळीची गीते, शेतीविषयक गीते पारंपारिक देवदेवतांची गीते ते आपल्या पावरी भिल्ल यो बोलीभाषेतून गातात.स्त्रियांना दागिन्यांची फार हौस असते, मंगल प्रसंगी किंवा सणावाराला या निरनिराळया अलंकारांवर म्हणजे गळयातले, हातापायातील दागिने या सर्वांवर आधारीत अशी लोकगीते स्त्रिया गात असतात.

आदिवासींचीच अत्यंत मागासलेली अशी कातकरी आदिवासी ही एक जमात आहे, प्रामुख्याने महाराष्ट्रातील रायगड, ठाणे, रत्नागिरी, पुणे या जिल्हयांतील डोंगर द-यांतील जंगल भागातून यांचे पाडे, वस्त्या आढळतात.ते निसर्गाशी पूर्ण एकरूप आहेत.लाकूडतोड करणे,खैराच्या झाडापासून'कात' तयार करणे, प्रसंगी मोलमजूरी करणे इत्यादी कामे करतात.

सणावाराला ढोलाच्या ठेक्यावर प्रामुख्याने समूहगीत गात असतात.त्यातून त्यांच्या दैनंदिन व सामाजिक जीवन दर्शन घडते.

आदिवासी समाजाने आपली प्राचीन परंपरा आपल्या साहित्यातून जपून ठेवली आहे. नव्या काळाची आव्हाने स्वीकारतांना या समाजाला आदिमतेचा विसर पडलेला नाही. त्यातच त्यांच्या जीवनाच्या सांस्कृतिक प्रेरणा दडलेल्या आहेत. या समाजाने आपले व्यवसाय, आपली घरे,घरांची रचना, वेशभूषा, राहणीमान, रिती परंपरा, सण, उत्सव, देवता, आचार-विचार, श्रध्दा, समजुती, कला आणि संगीत जोपासलेले आहेत. 'आदिम असलेला हा आदिवासी समाज निर्धन असेल, निरक्षर असेल, पण तो असंस्कृत नाही. कारण त्यांची स्वतःची एक अर्थपूर्ण अशी संस्कृती आहेच. त्यांना अनेक कलाही अवगत आहेत.'

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – IV December 2014

आदिवासी साहित्याला लोकसाहित्याचे अधिष्ठान आहे. हे लोकसाहित्य त्यांच्या साहित्याचे बलस्थानही आहे. आदिवासींची साहित्यपरंपराही मौखिक आहेत. आज कुठे आपण ती आपल्या मराठी भाषेत लिप्यंतर करून जतन करून ठेवत आहोत. तो एकेकाळी सरंजामशाही, वसाहतवाद, साम्राज्यवाद, यांचा बळी ठरलेला होता. आज शासकीय कायद्यांमुळे परंपरागत जगण्याचे साधन असलेल्या जंगल जमिनीवर पुन्हा एकदा शासकीय जमीनदारी सुरू झाली आहे.अशी मते व्यक्त केली जात आहेत. विकासाच्या नावाखाली त्यांचे विस्थापन, मजुरीच्या नावाखाली त्याची वेठबिगारी व सुधारणेच्या नावाखाली मानसिक गुलामगिरी त्याच्यावर लादली जात आहे.अशीही मते व्यक्त केली जात आहेत.

आदिवासी समाज हा आता आपला इतिहास किंवा भूतकाळ विसरण्याला प्रारंभ झाला आहे.त्याला कारण त्याचे शिक्षित होणे आणि मूळच्या समाजापासून दूर शहरात राहणे व सुसंस्कृत समाजात वावरतांना आपल्या परंपरा, चालिरिती न जोपासणं असा काहीसा प्रवास सुरू झाल्याने जाणवते. अलीकडच्या आदिवासींच्या नव्या पिढीला आपल्या संस्कृतीचा विसर पडता कामा नये म्हणून त्यांनी त्याच अवस्थेत जगावे असे नाही.पण सुधारित होऊनही आपला अवघा इतिहास आणि भूतकाळ साहित्याच्या आधारे जिवंत ठेवावा. वर्तमानकाळात इतिहास लिहितांना किंवा साहित्याचा प्रवास करतांना भूतकाळाकडे दुर्लक्ष करू नये. सर्वच ऐतिहासिक घटनांची वस्तुनिष्ठ दखल घेण्यावरच आदिवासी साहित्याची समृध्दी अवलंबून आहे.

आज सीमावर्ती भागात असलेल्या आदिवासींमध्ये राजकीय जागृतीला प्रारंभ झालेला आहे. त्यामुळे आदिवासी समाजात आणि साहित्यात पुढच्या काळात जरा वेगळे समाजजीवन येण्याची शक्यता आहे. ते आपण स्वीकारावे.कारण स्वातंत्र्यानंतर त्यांच्यात झालेली विविध प्रकारची जागृती यामुळे त्यांना मानवी मूल्यांची जाणीव झालेली आहे. विषमता ही जाणवू लागलेली आहे. त्यांनीही काही प्रमाणात दलित साहित्याप्रमाणे वेदना, विद्रोहाची भूमिका स्वीकारलेली आहे. त्यामुळेच आता विविध सभा, संमेलने, मंडळे, विविध प्रकारच्या चळवळींची स्थापना झालेली आहे आणि यातून आदिवासींच्या नव्या जीवनाचे दर्शन आपल्याला घडणार आहे.परंतु आदिवासी साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून आपल्या लोकजीवनाचे, लोकसंस्कृतीचे आणि लोकमानसाचे जतन व संवर्धन करणे आवश्यक आहे. या पिढीने जर ते काम केले नाही तर पुढच्या त्यांच्या आणि आपल्या पिढीलाहीया जीवनाचा कदाचित परिचय न राहण्याची शक्यता आहे. त्यांचे साहित्य हे त्यांच्या जीवनाच्या विकासाचे साक्षीदार आहे. म्हणून त्याचे संगोपन होणे आवश्यक वाटते.

**संदर्भ :**


1. महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य - डॉ. शैलजा देवगांवकर
2. लोकसाहित्याचे स्वरूप - दुर्गाबाई भागवत.
3. भारतीय संस्कृतीकोश -पं. महादेवशास्त्री जोशी.
4. आदिवासींचे सण उत्सव - सरोजिनी बाबर.
5. आदिवासी ठाकरं आणि त्यांची लोकगीते - मा. रा. लामखेडे.
6. मराठीतील नवे प्रवाह-आदिवासी साहित्य, प्रा. विनायक तूमराम.
7. आदिवासींची गोडगाणी - महादेव गोपाळ कडू.
8. आदिवासी साहित्य - स्वरूप आणि समस्या - डॉ. विनायक तुमराम.
9. आदिवासी बोलू लागला - ॲड. माधव मोरे
10. लोक वाड्.मय : रूप आणि स्वरूप - डॉ. शरद व्यवहारे